भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# विदेशी अभिदान (विनियमन) अधिनियम, १९७६

(१९७६ चा अधिनियम क्रमांक ४९)

[१ एप्रिल १९९६ रोजी यथाविद्यमान]

# The Foreign Contribution (Regulation) Act, 1976

**(Act No. 49 of 1976)**

**[As in force on the 1st April 1996]**

संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९८

[ किंमत रु. ३-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ एप्रिल १९९६ रोजी यथाविद्यमान असलेला फॉरेन कॉंट्रीब्युशन रेग्युलेशन ॲक्ट, १९७६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग २, खंड ७, अंक २ दिनांक १६ ऑगस्ट १९९६ यात पृष्ठ २७० ते २८० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतीच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १६ ऑगस्ट १९९६.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Foreign Contribution (Regulation) Act, 1976. as on the 1st April 1996 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 7, dated 16th August, 1996 on pages 270 to 280.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated: the 16th August 1996.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# विदेश अभिदान (विनियमन) अधिनियम, १९७६

## कलमांचा क्रम

### प्रकरण पहिले

### प्रारंभिक


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रयुक्ती आणि प्रारंभ.
२. व्याख्या.
३. अन्य कायदे लागू होण्यास आडकाठी नाही.


### प्रकरण दुसरे

### विदेशी अभिदान व पाहुणचार यांचे विनियमन


४. निवडणुकीनंतर उमेदवार, इ. नी विदेशी अभिदान न स्वीकारणे.
५. राजकीय स्वरूपाच्या संघटनेने केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतेही विदेशी अभिदान न स्वीकारणे.
६. विदेशी अभिदान स्वीकारणारे अधिसंघ आणि व्यक्ती यांनी केंद्र शासनाला सूचना देणे.
७. शिष्यवृत्या, इ. मिळवणाऱ्यांनी केंद्र शासनाला सूचना देणे.
८. कोणत्या व्यक्तींना कलम ४ लागू होणार नाही.
९. विदेशी पाहुणचार स्वीकारण्यावरील निर्बन्ध.
१०. विवक्षित प्रकरणांमध्ये विदेशी अभिदान, इत्यादी स्वीकारण्याला मनाई करण्याची केंद्र शासनाची शक्ती.
११. विदेशी अभिदान किंवा पाहुणचार स्वीकारण्यासाठी लागणारी पूर्वपरवानगी मिळविण्याकरिता विहित नमुन्यात अर्ज करणे.


### प्रकरण तिसरे

### संकीर्ण


१२. अधिनियमाचे व्यतिक्रमण करून मिळालेल्या चलनाचे पैसे देण्याला मनाई करण्याची शक्ती.
१३. विदेशी अभिदान स्वीकारणाऱ्यांनी हिशेब, इत्यादी ठेवणे.
१४. हिशेब किंवा नोंदी यांची पाहणी.
१५. हिशेबाचे किंवा नोंदीचे कागदपत्र यांचे अभिग्रहण.
१५क. लेख्याची लेखापरीक्षा.
१६. या अधिनियमाचे व्यतिक्रमण करून मिळविलेल्या वस्तूचे किंवा चलनाचे अभिग्रहण.
१७. 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' यानुसार अभिग्रहण करणे.
१८. या अधिनियमाचे व्यतिक्रमण करून मिळविलेली वस्तू किंवा चलन सरकारजमा करणे.
१९. सरकारजमा करण्यासंबंधीचा अभिनिर्णय.
२० सरकारजमा करण्याच्या अभिनिर्णयापूर्वी बाजू मांडण्याची संधी देणे.
२१. अपील.
२२. कलम १२ चे उल्लंघन करून वस्तू किंवा चलन मिळाल्याबद्दल शिक्षा.
२३. या अधिनियमाच्या कोणत्याही उपसंबंधाच्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
२४. वस्तू किंवा चलन सरकारजमा करण्यासाठी उपलब्ध नसेल त्या बाबतीत जादा द्रव्यदंड बसवण्याची शक्ती.
२५. स्वतंत्र शिक्षेची तरतूद करण्यात न आलेल्या अपराधांकरिता शिक्षा.
२५क. विदेशी अभिदानाच्या स्वीकृतीस मनाई.
२६. कंपन्यांनी केलेलेअ पराध.
२७. या अधिनियमाखालील अपराधांचे खटले चालविण्याला आडकाठी.
२८. या अधिनियमाखालील प्रकरणांचे अन्वेषण.
२९. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.
३०. नियम करण्याची शक्ती.
३१. सूट देण्याची शक्ती.
३२. सरकारी संव्यवहारांना हा अधिनियम लागू न होणे.

शब्दसूची—इंग्रजी—मराठी

मराठी—इंग्रजी

# विदेशी अभिदान (विनियमन) अधिनियम, १९७६

(१९७६ चा अधिनियम क्रमांक ४९)

(१ एप्रिल १९९६ रोजी यथाविद्यमान)

[३१ मार्च १९७६]

संसदीय संस्था, राजकीय अधिसंघ व विद्याविषयक आणि अन्य स्वयंसेवी संघटना, तसेच, राष्ट्रीय जीवनाच्या महत्त्वाच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती यांना सार्वभौम लोकशाही गणराज्यांच्या मूल्यांशी सुसंगत अशा पद्धतीने कार्य करता येईल अशी खालीलायक तजवीज करण्याच्या हेतूने, विवक्षित व्यक्ती किंवा अधिसंघ यांनी विदेशी अभिदानाचा किंवा विदेशी पाहुणचाराचा स्वीकार करणे आणि त्याचा विनियोग करणे याबाबत विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा त्यांना आनुषंगिक असलेल्या बाबींसाठी अधिनियम.

संसदेकडून भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण पहिले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास ‘विदेशी अभिदान (विनियमन) अधिनियम, १९७६’ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रयुक्ती आणि प्रारंभ.

(२) या अधिनियमाचा विस्तार संपूर्ण भारतभर असून, तो—

(क) भारताबाहेरील भारतीय नागरिक ; आणि

(ख) भारतात नोंदणी केलेल्या किंवा निर्गमित केलेल्या कंपन्या किंवा निगमनिकाय यांच्या भारताबाहेरील सहयोगी कंपन्या, शाखा किंवा पोट-कंपन्या ;

यांनाही लागू होईल.

(३) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकाला हा अधिनियम अंमलात येईल.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "अधिसंघ" याचा अर्थ, भारतात कार्यालय असलेला व्यक्तिसंघ, असा आहे—मग तो निगमित असो वा नसो—आणि त्यात ‘संस्था नोंदणी अधिनियम, १८६०’ (१८६० चा २१) अन्वये नोंदणी केलेल्या अगर न केलेल्या संस्थेचा आणि अन्य कोणत्याही संघटनेचा समावेश होतो—मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो ;

(ख) "निवडणुकीतील उमेदवार" याचा अर्थ, कोणत्याही विधानमंडळाच्या निवडणुकीकरिता उमेदवार म्हणून रीतसर नामनिर्देशित करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(ग) "विदेशी अभिदान" याचा अर्थ, कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून देणगी म्हणून मिळालेली, सुपूर्द करण्यात आलेली किंवा हस्तांतरित करण्यात आलेली पुढील प्रकारची बाब, असा आहे; ती म्हणजे—

(एक) एखाद्या व्यक्तीला तिच्या वैयक्तिक वापराकरिता मिळालेल्या वस्तूचे अशा देणगीच्या दिनांकास भारतातील बाजारमूल्य एक हजाराहून अधिक नसेल तर अशी वस्तू सोडून अन्य कोणतीही वस्तू ;

(दोन) भारतीय अगर विदेशी असे कोणतेही चलन;

(तीन) ‘विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६)-कलम २-खंड (एक) मध्ये व्याख्या दिल्याप्रमाणे कोणताही विदेशी रोखा.

[१][**स्पष्टीकरण**—या खंडात उल्लेखलेली कोणतीही वस्तू, चलन, किंवा विदेशी रोखा, ज्या व्यक्तीला एकतर थेट किंवा एका वा अनेक व्यक्तींमार्फत विदेशी उगमस्थानाकडून मिळालेला असेल, तिने केलेले त्या वस्तूचे, चलनाचे किंवा रोख्याचे दान, सुपूर्दगी किंवा हस्तांतरण हे देखील या खंडाच्या अर्थांतर्गत विदेशी अभिदान मानण्यात येईल.]

(घ) "विदेशी पाहुणचार" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीला कोणत्याही परकीय देशाच्या किंवा प्रदेशाच्या प्रवासाचा खर्च देण्याबाबत अथवा तिच्या राहण्याची, जेवणखाणाची, येण्याजाण्याची किंवा वैद्यकीय उपचाराची सोय विनामूल्य करण्याबाबत मांडलेला, व केवळ प्रसंगवशात, नसलेला असा कोणताही प्रस्ताव, असा आहे ;

---

१. १९८५ चा अधिनियम १, कलम २ (क) द्वारे मूळ अधिनियमाच्या कलम २ (ग) च्या शेवटी हे स्पष्टीकरण समाविष्ट केले (दिनांक २० ऑक्टोबर १९८४ रोजी व तेव्हापासून).

(ङ) "विदेशी उगमस्थान" यात पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(एक) कोणत्याही परकीय देशाचे किंवा प्रदेशाचे सरकार आणि अशा सरकारची कोणतीही उपयंत्रणा,

(दोन) संयुक्त राष्ट्र संघटना किंवा तिच्या विशेष उपयंत्रणांपैकी कोणतीही उपयंत्रणा जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी किंवा केंद्र शासन यासंबंधात शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी अन्य उपयंत्रणा सोडून कोणतीही आंतरराष्ट्रीय उपयंत्रणा,

(तीन) 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) -कलम ५९१ याच्या अर्थानुसार असलेली एखादी विदेशी कंपनी, आणि त्यामध्ये—

(क) विदेशी कंपनीची पोट-कंपनी असलेली एखादी कंपनी, आणि

(ख) या अधिनियमाच्या अर्थानुसार असलेला एखादा बहुराष्ट्रीय निगम यांचाही समावेश आहे,

(चार) विदेशी कंपनी खेरीजकरून, परकीय देशात किंवा प्रदेशात निगमित झालेला अन्य निगम,

(पाच) या अधिनियमाच्या अर्थानुसार असलेला बहुराष्ट्रीय निगम,

(सहा) 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या अर्थानुसार असलेल्या एखाद्या कंपनीच्या भागभांडवलामध्ये पुढील धारकांपैकी म्हणजे—

(क) एखाद्या परकीय देशाचे किंवा प्रदेशाचे सरकार,

(ख) एखाद्या परकीय देशाचे किंवा प्रदेशाचे नागरिक,

(ग) एखाद्या परकीय देशात किंवा प्रदेशात निगमित करण्यात आलेले निगम,

(घ) एखाद्या परकीय देशात किंवा प्रदेशात स्थापन करण्यात आलेले किंवा नोंदण्यात आलेले न्यास, सोसायट्या किंवा अन्य व्यक्तीसंघ (मग ते निगमित करण्यात आलेले असोत वा नसोत),

यांच्यापैकी एकाने किंवा अनेकांनी शेअर्स धारण केलेले असून एकेकट्याच्या किंवा सर्वांच्या शेअर्सचे मिळून होणारे मूल्य भागभांडवलाच्या नामित मूल्याच्या निम्म्याहून अधिक असेल तर, अशी कंपनी,

(सात) कोणत्याही परकीय देशातील किंवा प्रदेशातील व्यवसाय संघ— मग अशा परकीय देशात किंवा प्रदेशात त्याची नोंदणी करण्यात आलेली असो वा नसो,

(आठ) विदेशी न्यास,—मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो—किंवा जे एकतर न्यासाच्या स्वरूपाचे आहे किंवा ज्याला मुख्यत्वेकरून परकीय देशाकडून किंवा प्रदेशाकडून वित्त पुरवठा केला जातो असे विदेशी प्रतिष्ठान,

(नऊ) भारताबाहेरील स्थापन झालेली किंवा नोंदणी करण्यात आलेली एखादी सोसायटी, एखादा क्लब किंवा अन्य व्यक्तीसंघ,

(दहा) परकीय देशाचा नागरिक,

मात्र केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जिला भारतात कार्य करण्यास परवानगी दिलेली आहे अशा कोणत्याही विदेशी संस्थेचा यात अंतर्भाव होत नाही ;

(च) "विधानमंडळ" याचा अर्थ, प्रकरणपरत्वे, पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) संसदेचे कोणतेही सभागृह,

(दोन) राज्याची विधानसभा किंवा ज्या राज्यात विधानपरिषद आहे त्या राज्याच्या बाबतीत त्या राज्याच्या विधानमंडळाचे कोणतेही सभागृह,

(तीन) 'संघ राज्यक्षेत्रे शासन अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०) या अन्वये घटित केलेली संघ राज्य क्षेत्राची विधानसभा,

(चार) 'दिल्ली प्रशासन अधिनियम, १९६६' (१९६६ चा १९) - कलम ३ अन्वये घटित केलेली दिल्लीची महानगरपरिषद,

(पाच) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७३ चा २) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या महानगर क्षेत्रांमधील महानगरपालिका,

(सहा) संविधानाच्या सहाव्या अनुसूचीत उपबंधित केल्याप्रमाणे, आसाम व मेघालय या राज्यांमधील आणि मिझोरम या संघ राज्य क्षेत्रातील जिल्हा परिषदा आणि प्रादेशिक परिषदा, किंवा

(सात) केंद्र शासन अधिसूचित करील अशा अन्य कोणताही निर्वाचित सिद्ध निकाय;

¹[(छ) "राजकीय पक्ष" याचा अर्थ,—

(एक) (१) निवडणूक निशाणी (आरक्षण आणि वाटप) आदेश, १९६८ या अन्वये निवडणूक आयोगाकडे जो नोंदलेला असेल किंवा नोंदलेला असल्याचे मानण्यात येत असेल; किंवा

(२) विधानमंडळाच्या निवडणुकीसाठी ज्याने उमेदवार उभा केलेला असेल, परंतु, निवडणूक निशाणी (आरक्षण आणि वाटप) आदेश, १९६८ या अन्वये निवडणूक आयोगाकडे जो नोंदलेला नसेल किंवा नोंदला असल्याचे मानण्यात येत नसेल;

असा भारताचा नागरिक व्यक्तींचा अधिसंघ किंवा निकाय, असा आहे;

(दोन) त्या त्या काळी अंमलात असल्याप्रमाणे भारतीय निवडणूक आयोगाची अधिसूचना क्र. ५६/ज. आणि का./८४, दिनांक २७ सप्टेंबर, १९८४ याच्या तक्ता एक मधील स्तंभ १ मध्ये नमूद केलेला राजकीय पक्ष, असा आहे.]

(ज) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(झ) "नोंदलेले वृतपत्र" याचा अर्थ, 'मुद्रण व पुस्तक नोंदणी अधिनियम, १८६७' (१८६७ चा २५) या अन्वये नोंदणी केलेले वतपत्र, असा आहे;

(ञ) "पोट-कंपनी" व "सहयोगी कंपनी" यांना 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) यामध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ आहेत;

(ट) "व्यवसाय संघ" याचा अर्थ, 'व्यवसाय संघ अधिनियम, १९२६' (१९२६ चा १६) या अन्वये नोंदणी केलेला व्यवसाय संघ, असा आहे.

**स्पष्टीकरण.**—एखादा निगम हा परकीय देशात किंवा प्रदेशात निगमित झालेला असून जर—

(क) दोन किंवा अधिक देशांत किंवा प्रदेशांत अशा निगमाची एखादी पोट-कंपनी, शाखा किंवा कामधंद्याची जागा असेल तर; किंवा

(ख) असा निगम दोन किंवा अधिक देशांत किंवा प्रदेशांत कामधंदा चालवीत असेल, किंवा अन्यथा कार्य करित असेल तर,

तो बहुराष्ट्रीय निगम असल्याचे मानले जाईल.

(२) यामध्ये वापरलेल्या व व्याख्या न केलेल्या परंतु 'विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९७३' (१९७३ चा ४६) यात व्याख्या केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना त्या अधिनियमात नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

(३) या अधिनियमात वापरलेल्या व या अधिनियमात किंवा 'विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९७३' (१९७३ चा ४६) यामध्ये व्याख्या न केलेल्या, परंतु 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) किंवा 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१' (१९५१ चा ४३) यामध्ये व्याख्या केलेल्या शब्दांना किंवा शब्दप्रयोगांना अशा अधिनियमात नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

**अन्य कायदे लागू होण्यास आडकाठी नाही.**

**३.** या अधिनियमाचे उपबंध त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याला न्यूनकारी नव्हे तर त्यास पूरक असतील.

## प्रकरण दुसरे

### विदेशी अभिदान व पाहुणचार यांचे विनियमन

**निवडणुकीतील उमेदवार, इ. नी विदेशी अभिदान न स्वीकारणे.**

४. (१) कोणतेही विदेशी अभिदान पुढीलपैकी कोणत्याही व्यक्तीला स्वीकारता येणार नाही, त्या व्यक्ती म्हणजे,—

(क) निवडणुकीतील उमेदवार,

(ख) एखाद्या नोंदलेल्या वृत्तपत्राचा वृत्तप्रतिनिधी, स्तंभलेखक, व्यंगचित्रकार, संपादक, मालक, मुद्रक किंवा प्रकाशक,

(ग) ²[न्यायाधीश, शासकीय सेवक] किंवा कोणत्याही निगमाचा कर्मचारी,

(घ) कोणत्याही विधानमंडळाचा सदस्य,

(ङ) कोणताही राजकीय पक्ष किंवा त्याचा पदाधिकारी.

---

१. १९८५ चा अधिनियम १, कलम २ (ख) द्वारे मूळ अधिनियमाच्या कलम २ (छ) ऐवजी हा मजकूर समाविष्ट केला. (२० ऑक्टोबर, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ अधिनियमाच्या कलम ४ (१) (ग) मधील "शासकीय सेवक" या शब्दांऐवजी "न्यायाधीश, शासकीय सेवक" हा मजकूर घातला.

**स्पष्टीकरण.**—खंड (ग्) आणि कलम ९ मध्ये "निगम" याचा अर्थ, शासनाच्या मालकीचा किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेला निगम, असा असून त्यात 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या दिल्याप्रमाणे असलेला शासकीय कंपनीचा समावेश होतो.

(२) (क्) भारतात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला आणि भारताबाहेर राहणाऱ्या कोणत्याही भारतीय नागरिकाला कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा दोघांच्याही वतीने कोणतेही विदेशी अभिदान स्वीकारता येणार नाही अथवा कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून येणारे कोणतेही चलन संपादन करता येणार नाही किंवा संपादन करण्याचे मान्य करता येणार नाही.

(ख्) भारतात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून स्वीकारलेले कोणतेही भारतीय किंवा विदेशी चलन अन्य कोणत्याही व्यक्तीकडे द्यावयाचे असेल तेव्हा तिला, जर असे चलन कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या व्यक्तीला किंवा दोघांनाही देण्याचा अशा अन्य व्यक्तीचा उद्देश आहे किंवा ती तसे करण्याची शक्यता आहे हे माहीत असेल किंवा तसे वाटण्यास वाजवी कारण असेल तर, ते तिला त्या अन्य व्यक्तीकडे सुपूर्द करता येणार नाही.

(ग्) भारताबाहेर राहणाऱ्या कोणत्याही भारतीय नागरिकाला कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून स्वीकारलेले कोणतेही भारतीय किंवा विदेशी चलन—

(एक) कोणत्याही राजकीय पक्षाकडे किंवा पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा दोघांकडे, किंवा

(दोन) असे चलन कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या व्यक्तीला किंवा त्या दोघांनाही देण्याचा अन्य कोणत्याही व्यक्तीचा उद्देश आहे किंवा तो तसे करण्याची शक्यता आहे हे स्वत:ला माहीत असेल किंवा तसे वाटण्यास वाजवी कारण असेल तर अशा अन्य व्यक्तीकडे सुपूर्द करता येणार नाही.

(३) कलम ६-पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही अधिसंघाच्यावतीने कोणत्याही परकीय उगमस्थानाकडून भारतीय किंवा विदेशी चलन स्वीकारणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला असे चलन—

(एक) ते ज्या अधिसंघाकरता स्वीकारण्यात आले असेल त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिसंघाकडे किंवा संघटनेकडे, किंवा

(दोन) ते ज्या अधिसंघाकरिता स्वीकारण्यात आले असेल त्याव्यतिरिक्त अन्य अधिसंघाकडे देण्याचा अन्य कोणत्याही व्यक्तीचा उद्देश आहे किंवा ती तसे करण्याची शक्यता आहे हे स्वत:ला माहीत असेल किंवा तसे वाटण्यास वाजवी कारण असेल तर अशा अन्य व्यक्तीकडे ते सुपूर्द करता येणार नाही.

राजकीय स्वरूपाच्या संघटनेने केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगी-शिवाय कोणतेही विदेशी अभिदान न स्वीकारणे.

५. (१) राजकीय पक्ष नसलेल्या राजकीय स्वरूपाच्या कोणत्याही संघटनेला केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतेही विदेशी अभिदान स्वीकारता येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "राजकीय पक्ष नसलेली परंतु राजकीय स्वरूपाची अशी संघटना" याचा अर्थ, संघटनेची कार्ये किंवा संघटनेकडून प्रचार करण्यात येणारी तत्त्वप्रणाली किंवा संघटनेचा कार्यक्रम किंवा कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्याशी असलेला संघटनेचा सहयोग हे विचारात घेऊन केंद्र शासन शासकीय राजपत्रात प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशी संघटना, असा आहे.

(२) (क्) भारतात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला आणि भारताबाहेर राहणाऱ्या कोणत्याही भारतीय नागरिकाला केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या संघटनेच्यावतीने कोणतेही विदेशी अभिदान स्वीकारता येणार नाही किंवा कोणतेही विदेशी चलन संपादन करता येणार नाही किंवा संपादन करण्याचे मान्य करता येणार नाही.

(ख) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या संघटनेकडे कोणतेही विदेशी चलन देण्याचा अन्य कोणत्याही व्यक्तीचा उद्देश आहे किंवा ती तसे करण्याची शक्यता आहे असे जर कोणत्याही एखाद्या व्यक्तीला स्वत:ला माहीत असेल किंवा तसे वाटण्यास वाजवी कारण असेल तर, त्या व्यक्तीला केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय अशा अन्य व्यक्तीकडे असे चलन सुपूर्द करता येणार नाही.

(ग्) भारताबाहेर राहणाऱ्या कोणत्याही भारतीय नागरिकाला कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून स्वीकारलेले कोणतेही भारतीय किंवा विदेशी चलन केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय—

(एक) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही संघटनेकडे, किंवा

(दोन) असे चलन पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या संघटनेकडे देण्याचा एखाद्या व्यक्तीचा उद्देश आहे किंवा ती तसे करण्याची शक्यता आहे हे स्वत:ला माहीत असेल किंवा तसे वाटण्यास वाजवी कारण असेल तर, अशा अन्य व्यक्तीकडे,

सुपूर्द करता येणार नाही.

विदेशी अभिदान स्वीकारणारे अधिसंघ आणि व्यक्ती यांनी केंद्र शासनाला सूचना देणे.

[१६. (१) ज्याच्याकडे निश्चित असा सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रम आहे असा (कलम ५ चे पोट-कलम (१) यामध्ये निर्देशिलेली संघटना वगळून) कोणताही अधिसंघ,—

(क) या अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांना अनुसरून केंद्र शासनाने अशा अधिसंघाची नोंदणी केल्याशिवाय ; आणि

(ख) अशी नोंदणी करण्यासाठी केलेल्या अर्जात विनिर्दिष्ट केलेल्या बँकेच्या केवळ त्याच शाखेमार्फत असे विदेशी अभिदान स्वीकारण्याचे अधिसंघाने मान्य केल्याशिवाय ;

—विदेशी अभिदान स्वीकारणार नाही,

आणि अशी नोंदणी झालेला प्रत्येक अधिसंघ, त्यास किती विदेशी अभिदान मिळाले, असे विदेशी अभिदान कोठून व कोणत्या पद्धतीने मिळाले आणि कोणत्या पद्धतीने आपण अशा विदेशी अभिदानाचा विनियोग केला यासंबंधीची माहिती विहित करण्यात येईल अशा मुदतीत आणि तशा पद्धतीने, केंद्र शासनाकडे पाठवील :

परंतु, ज्या बँकेच्या शाखेमार्फत कोणतेही विदेशी अभिदान घेण्याचे अशा अधिसंघाने मान्य केले असेल त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही शाखेमार्फत त्या अधिसंघाने कोणतेही विदेशी अभिदान घेतल्यास किंवा अशी माहिती विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा पद्धतीने देण्यात त्याने कसूर केल्यास किंवा त्याने कोणतीही खोटी माहिती दिल्यास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशी अधिसूचना अंमलात आल्याच्या दिनांकानंतर, केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही विदेशी अभिदान अशा अधिसंघाला स्वीकारता येणार नाही, असा निदेश केंद्र शासन देऊ शकेल.

(१क) पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या प्रत्येक अधिसंघाची त्या पोटकलमाअन्वये केंद्र शासनाने नोंदणी केली नसल्यास, त्याला कोणतेही विदेशी अभिदान केवळ केंद्र शासनाची पूर्वपरवानगी मिळवल्यानंतरच स्वीकारता येईल आणि त्यास किती विदेशी अभिदान मिळाले असे विदेशी अभिदान कोठून व कोणत्या पद्धतीने मिळाले आणि कोणत्या प्रयोजनास्तव व कोणत्या पद्धतीने त्याने अशा विदेशी अभिदानाचा विनियोग केला, यासंबंधीची माहीती तो अधिसंघ, विहित करण्यात येईल अशा मुदतील आणि तशा पद्धतीने, केंद्र शासनाकडे पाठवील.]

(२) निवडणुकीला उभ्या राहिलेल्या ज्या उमेदवाराला, तो ज्या दिनांकाला उमेदवार म्हणून रीतसर नामनिर्देशित झाला असेल त्या दिनांकाच्या लगतपूर्वी एकशे ऐंशी दिवसांमध्ये केव्हाही कोणतेही विदेशी अभिदान मिळाले असेल अशा उमेदवाराला, आपणास किती विदेशी अभिदान मिळाले, असे विदेशी अभिदान कोठून व कोणत्या पद्धतीने मिळाले आणि कोणत्या प्रयोजनास्तव व कोणत्या पद्धतीने आपण अशा विदेशी अभिदानाचा विनियोग केला यासंबंधीची सूचना, विहित करण्यात येईल अशा मुदतीत आणि अशा पद्धतीने केंद्र शासनाकडे पाठवावी लागेल.

शिष्यवृत्त्या, इ. मिळवणाऱ्यांनी केंद्र शासनाला सूचना देणे.

७. (१) कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून कोणतीही शिष्यवृत्ती, पाठ्यवेतन किंवा तत्सम स्वरूपाची कोणतीही रक्कम ज्याला मिळते अशा प्रत्येक भारतीय नागरिकाला, आपणास किती शिष्यवृत्ती पाठ्यवेतन किंवा अन्य रक्कम मिळते आणि अशी शिष्यवृत्ती, पाठ्यवेतने किंवा अन्य रक्कम आपणास कोणत्या विदेशी उगमस्थानाकडून आणि कोणत्या प्रयोजनास्तव मिळालेली आहे किंवा मिळत आहे यासंबंधीची सूचना, विहित करण्यात येईल अशा मुदतीत आणि अशा पद्धतीने केंद्र शासनाकडे पाठवावी लागेल.

(२) एखाद्या भारतीय नागरिकाला कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून शिष्यवृत्ती, पाठ्यवेतन किंवा अन्य रकमेच्या रूपाने कोणत्याही आवर्ती रकमा मिळत असतील तर त्याबाबतीत पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या सूचनेमध्ये अशा आवर्ती रकमा अशा भारतीय नागरिकाला किती कालांतरागणिक आणि कोणत्या प्रयोजनास्तव मिळणार आहेत त्यासंबंधी नेमकी माहिती नमूद केली तरी तेवढे पुरेसे होईल.

(३) अशा शिष्यवृत्त्या, पाठ्यवेतने किंवा तत्सम स्वरूपाच्या इतर रकमा यांचे वार्षिक मूल्य, केंद्र शासन या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा मर्यादेपेक्षा अधिक नसेल तर, अशा शिष्यवृत्त्या, अशी पाठ्यवेतने किंवा अन्य रकमा यांच्या संबंधात अशी, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मध्ये निर्देशित केलेली सूचना देणे आवश्यक असणार नाही.

कोणत्या व्यक्तींना कलम ४ लागू होणार नाही.

८. कलम १० च्या उपबंधाच्या अधीनतेने, कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, जर पुढील स्वरूपात कोणतेही विदेशी अभिदान स्वीकारले असेल तर, त्या कलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट अशा विदेशी अभिदानाच्या स्वीकृतीस लागू होणार नाही,—

(क) कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून अशा व्यक्तीला किंवा तिच्या हाताखाली काम करणाऱ्या व्यक्तिसमूहाला देय असणारा पगार, वेतन किंवा अन्य पारिश्रमिक किंवा भारतात चालविल्या जाणाऱ्या धंद्याच्या सर्वसामान्य ओघात अशा विदेशी उगमस्थानाकडून देण्यात येणारी रक्कम; अथवा

(ख) आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या किंवा वाणिज्य व्यवहाराच्या ओघात किंवा त्या व्यक्तीने भारताबाहेर केलेल्या धंद्याच्या सर्वसामान्य ओघात देण्यात येणारी रक्कम अथवा ;

---

१. १९८५ चा अधिनियम १, कलम ४ द्वारे मूळ अधिनियमाच्या कलम (६) ऐवजी हा मजकूर समाविष्ट केला.

(ग) एखाद्या विदेशी उगमस्थानाने शासनाशी केलेल्या कोणत्याही संव्यवहाराच्या संबंधात अशा विदेशी उगमस्थानाचा अभिकर्ता म्हणून स्वीकारलेली रक्कम; अथवा

(घ) भारतीय प्रतिनिधी मंडळाचा सदस्य या नात्याने त्या व्यक्तीला देण्यात आलेली एखादी भेटवस्तू किंवा एखादा उपहार---मात्र ही भेटवस्तू किंवा उपहार केंद्र शासनाने अशी भेटवस्तू किंवा उपहार स्वीकारण्याच्या किंवा ठेवून घेण्याच्या संबंधात केलेल्या विनियमानुसार असला पाहिजे; अथवा

(ङ) केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीने त्या व्यक्तीच्या नातेवाईकांकडून कोणतेही विदेशी अभिदान मिळालेले असल्यास, असे अभिदान :

परंतु, आपल्या नातेवाईकांकडून मिळालेल्या अभिदानाचे मूल्य दर वर्षाला आठ हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल आणि असे किती अभिदान मिळाले, ते कोठून व कोणत्या पद्धतीने मिळाले आणि कोणत्या प्रयोजनास्तव व कोणत्या पद्धतीने आपण त्याचा विनियोग केला त्यासंबंधीची सूचना तिने केंद्र शासनाला दिलेली असेल तर, अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही;

(च) धंद्याच्या सर्वसामान्य ओघात कोणत्याही सरकारी मार्गाने, डाक कार्यालयांतून किंवा "विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९७३" (१९७३ चा ४६) या अन्वये विदेशी विनिमय चलनाच्या कोणत्याही प्राधिकृत व्यापाऱ्यामार्फत मिळालेला रकमेचा भरणा.

**स्पष्टीकरण.**---या अधिनियमामध्ये "नातेवाईक" या शब्दप्रयोगाला, 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) यात नेमून दिलेला अर्थ असेल.

विदेशी पाहुणचार स्वीकारण्यावरील निर्बन्ध.

९. विधानमंडळाचा कोणताही सदस्य, राजकीय पक्षाचा पदाधिकारी, [1][न्यायाधीश, शासकीय सेवक] किंवा कोणत्याही निगमाचा कर्मचारी भारताबाहेरील देशाला किंवा प्रदेशाला भेट देत असताना त्याला केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही विदेशी पाहुणचाराचा स्वीकार करता येणार नाही :

परंतु, भारताबाहेरील अशा भेटीच्या वेळी आकस्मिक आजार उद्भवल्यामुळे तातडीने वैद्यकीय सहाय्य घेण्याची गरज भासली तर, अशी कोणतीही परवानगी मिळविणे आवश्यक असणार नाही. तथापि, असा विदेशी पाहुणचार मिळाला असेल त्याबाबतीत, असा पाहुणचार घेणाऱ्या व्यक्तीला असा पाहुणचार मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, असा पाहुणचार मिळाल्याची आणि कोठून व कशा पद्धतीने आपणास असा पाहुणचार मिळाला त्यासंबंधीची सूचना केंद्र शासनाकडे पाठवावी लागेल.

विवक्षित प्रकरणांमध्ये विदेशी अभिदान, इत्यादी स्वीकारण्याला मनाई करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

१०. केंद्र शासन,---

(क) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही अधिसंघाला किंवा कोणत्याही व्यक्तीला कोणतेही विदेशी अभिदान स्वीकारण्यास मना करू शकेल;

(ख) [2][कलम ६, पोटकलम (१) याच्या उपबंधांना बाध न येता कोणत्याही अधिसंघाला] कोणतेही विदेशी अभिदान स्वीकारण्यापूर्वी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी घेण्यास फर्मावू शकेल;

(ग) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तिवर्गाने किंवा कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेला सोडून अन्य कोणत्याही अधिसंघाने, प्रकरणपरत्वे अशा व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला किंवा अधिसंघाला मिळालेले विदेशी अभिदान किती होते आणि असे अभिदान कोठून व कोणत्या पद्धतीने मिळाले आणि कोणत्या प्रयोजनास्तव व कोणत्या पद्धतीने अभिदानाचा विनियोग करण्यात आला यासंबंधीची सूचना, विहित करण्यात येईल अशा मुदतीत आणि अशा पद्धतीने सादर करण्यास फर्मावू शकेल;

(घ) कलम ९ मध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा अशा व्यक्तिवर्गाला कोणत्याही विदेशी पाहुणचाराचा स्वीकार करण्यापूर्वी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी मिळविण्यास फर्मावू शकेल;

(ङ) कलम ९ मध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला आपणास कोणताही विदेशी पाहुणचार मिळाल्याबद्दलची तसेच तो कोठून व कोणत्या पद्धतीने मिळाला यासंबंधीची सूचना विहित करण्यात येईल अशा मुदतीत आणि अशा पद्धतीने सादर करण्यास फर्मावू शकेल :

परंतु, अशा अधिसंघाने, व्यक्तीने किंवा, प्रकरणपरत्वे, व्यक्तिवर्गाने असे विदेशी अभिदान स्वीकारल्यामुळे किंवा अशा व्यक्तीने विदेशी पाहुणचार स्वीकारल्यामुळे,---

(एक) भारताची सार्वभौमता व एकात्मता; किंवा

(दोन) लोकहित; किंवा

(तीन) कोणत्याही विधानमंडळाची निवडणूक मुक्तपणे आणि निःपक्षपातीपणे होणे; किंवा

(चार) कोणत्याही परकीय देशाशी असलेले मैत्रीचे संबंध; किंवा

---

१. १९८५ चा अधिनियम १, कलम ५ द्वारे मूळ अधिनियमाच्या कलम ९ मध्ये "शासकीय सेवक" या शब्दाऐवजी "न्यायाधीश, शासकीय सेवक" हा मजकूर समाविष्ट केला. (२० ऑक्टोबर, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला. (१ जानेवारी, १९८५ रोजी व तेव्हापासून).

(पाच) धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गट, जाती किंवा जमाती यांमधील एकोपा

यांना बाध येण्याची शक्यता आहे अशी केंद्र शासनाची खात्री झाल्याशिवाय अशी कोणतीही मनाई किंवा आज्ञा केली जाणार नाही.

**विदेशी अभिदान किंवा पाहुणचार स्वीकारण्यासाठी लागणारी पूर्व-परवानगी मिळविण्याकरिता विहित नमुन्यात अर्ज करणे.**

११. (१) कोणतेही विदेशी अभिदान किंवा विदेशी पाहुणचार स्वीकारण्यासाठी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी मिळविणे ज्यांना या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक करण्यात आले आहे अशी प्रत्येक मनुष्यव्यक्ती, अधिसंघ, संघटना किंवा अन्य व्यक्ती यांना असे कोणतेही अभिदान किंवा पाहुणचार स्वीकारण्यापूर्वी अशा परवानगीसाठी केंद्र शासनाकडे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा पद्धतीने अर्ज करावा लागेल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेला एखादा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत अशा अर्जाचा निकाल करण्यात आला नाही तर, उक्त नव्वद दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, अशा अर्जात मागितलेली परवानगी, केंद्र शासनाने दिलेली आहे असे मानण्यात येईल :

परंतु, केंद्र शासनाने एखाद्या अर्जाच्या संबंधात, अर्जदाराला, त्याच्या अर्जाचा निकाल करणे ज्यांमुळे शक्य होणार नाही अशा विशेष अडचणी नव्वद दिवसांचा उक्त कालावधी संपण्यापूर्वी कळविल्या असतील तर, आणखी पुढील तीस दिवसांचा कालावधी संपेपर्यंत, असा अर्ज केंद्र शासनाने मंजूर केलेला आहे असे मानण्यात येणार नाही.

## प्रकरण तिसरे

### संकीर्ण

**अधिनियमाचे व्यतिक्रमण करून मिळालेल्या चलनाचे पैसे देण्याला मनाई करण्याची शक्ती.**

१२. स्वत:ला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर केंद्र शासनाची अशी खात्री झाली की, एखाद्या व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली एखादी भारतीय किंवा परकीय वस्तू किंवा चलन असून ते तिने या अधिनियमात अंतर्भूत असलेल्यांपैकी कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करून मिळविलेले आहे तर अशा व्यक्तीला केंद्र शासनाच्या लेखी आदेशांचे पालन न करता एरव्ही अशी वस्तू किंवा चलन सुपूर्द करण्यास, हस्तांतरित करण्यास किंवा त्यासंबंधात कोणताही व्यवहार करण्यास केंद्र शासन लेखी आदेशाद्वारे मनाई करू शकेल आणि याप्रमाणे जिला मनाई करण्यात आली आहे अशा व्यक्तीला अशा आदेशाची एक प्रत देण्यात येईल आणि त्यानंतर 'बेकायदेशीर हालचाली (प्रतिबंध) अधिनियम, १९६७' (१९६७ चा ३७) याचे कलम ७-पोटकलमे (२), (३), (४) आणि (५) यांचे उपबंध आणि वस्तू किंवा चलन यांना किंवा त्यांच्या संबंधात शक्य तेथवर, लागू होतील आणि पैसे, रोखे आणि पतमान्यता यासंबंधी संदर पोटकलमामध्ये असलेल्या निर्देशांचा अर्थ अशा वस्तूचे किंवा चलनाचे निर्देश म्हणून लावला जाईल.

**विदेशी अभिदान स्वीकारणाऱ्यांनी हिशेब, इत्यादी ठेवणे.**

१३. कलम ६ मध्ये निर्देशित केलेल्या प्रत्येक अधिसंघाला—

(क्) आपणास मिळालेल्या कोणत्याही विदेशी अभिवदानाचा हिशेब, आणि

(ख्) आपण अशा अभिदानाचा विनियोग कशा रीतीने केला त्यासंबंधीची नोंद,

विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा पद्धतीने ठेवावी लागेल.

**हिशेब किंवा नोंदी यांची पहाणी.**

१४. (क्) एखादा राजकीय पक्ष, किंवा

(ख्) एखादी व्यक्ती, किंवा

(ग्) एखादी संघटना, किंवा

(घ्) एखादा अधिसंघ

यांनी या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केलेले असावे किंवा ते करत असावेत असा संशय घेण्यास काही आधार आहे असे केंद्र शासनाला सकारण वाटल्यास, ती कारणे लेखी नमूद करून केंद्र शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे [१][गट 'अ' चे पद] धारण करणारा जो राजपत्रित अधिकारी त्याला योग्य वाटेल अशा (यापुढे 'प्राधिकृत अधिकारी' म्हणून संबोधण्यात येणाऱ्या) अधिकाऱ्याला अशा राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने किंवा, प्रकरणपरत्वे, अधिसंघाने ठेवलेले कोणतेही हिशेब किंवा नोंदी यांची पाहणी करण्यासाठी प्राधिकृत करू शकेल, आणि त्यानंतर अशा अधिकाऱ्याला उक्त हिशेब किंवा नोंदी यांची पहाणी करण्यासाठी सूर्यास्तापूर्वी आणि सूर्योदयानंतर कोणत्याही जागेत किंवा जागेवर प्रवेश करण्याचा अधिकार राहील :

---

१. १९८५ चा अधिनियम १, कलम ७ द्वारे 'वर्ग एकचे पद' या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला. (२० ऑक्टोबर, १९८४ रोजी व तेव्हापासून).

परंतु, कोणताही राजपत्रित अधिकारी हा संघराज्याच्या किंवा, राज्याच्या कारभाराच्या संबंधात किमान दहा वर्षे इतका काळ [1][गट 'अ' चे पद] धारण करीत असल्याखेरीज, कोणत्याही राजकीय पक्षाने ठेवलेल्या हिशेबाची पाहणी करण्यासाठी प्राधिकृत केला जाणार नाही.

**हिशेबाचे किंवा नोंदीचे कागदपत्र यांचे अभिग्रहण.**

१५. कलम १४ मध्ये निर्देशित केलेला एखादा हिशेब किंवा नोंद पाहिल्यानंतर प्राधिकृत अधिकाऱ्याला जर कोणत्याही वाजवी कारणामुळे असे वाटले की, या अधिनियमाच्या किंवा विदेशी विनिमय चलनाशी संबंधित असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करण्यात आलेले आहे किंवा केले जात आहे, तर तो हिशेबाचे किंवा नोंदीचे कागदपत्र सक्तीने ताब्यात घेऊन ज्या न्यायालयात अशा व्यतिक्रमणाबद्दल कार्यवाही केली जाते त्या न्यायालयापुढे ते सादर करू शकेल :

परंतु, अशा हिशेबाच्या किंवा नोंदीच्या कागदपत्रांवरून उघडकीस आलेल्या व्यतिक्रमणाबद्दल करावयाची कार्यवाही ते कागदपत्र ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जर करण्यात आली नाही तर, प्राधिकृत अधिकाऱ्याला, ज्या व्यक्तीकडून ते कागदपत्र ताब्यात घेतले होते त्या व्यक्तीकडे ते परत करावे लागतील.

**[2][लेख्यांची लेखापरीक्षा.**

१५क. कोणतीही संघटना किंवा अधिसंघ, या अधिनियमाअन्वये कोणतेही विवरण, त्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत देण्यास चुकल्यास किंवा असे दिलेले विवरण कायद्यानुसार नसल्यास किंवा अशा विवरणाचे निरीक्षण केल्यानंतर केंद्र शासनाला, कोणत्याही वाजवी कारणास्तव असे वाटण्यास आधार असेल की, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करण्यात आले आहे किंवा करण्यात येत आहे तर, ते शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे यथास्थिती अशा संघटनेने किंवा अधिसंघाने ठेवलेल्या किंवा राखलेल्या कोणत्याही उक्त लेखा पुस्तकांची लेखापरीक्षा करण्याकरिता त्यास योग्य वाटेल अशा गट "अ" चे पद धारण करणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्यास प्राधिकृत करू शकेल, आणि त्यानंतर अशा प्रत्येक अधिकाऱ्यास, कोणत्याही जागेत किंवा जागेवर सूर्यास्तापूर्वी व सूर्योदयानंतर कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करण्याचा अधिकार असेल :

परंतु, अशा लेखापरीक्षेतून मिळालेली कोणतीही माहिती गुप्त ठेवण्यात येईल आणि या अधिनियमाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्यथा ती कुठेही उघडकीस आणली जाणार नाही.]

**या अधिनियमाचे व्यतिक्रमण करून मिळविलेल्या वस्तूचे किंवा चलनाचे अभिग्रहण.**

१६. केंद्र शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याला जर असे सकारण वाटत असेल की, एखाद्या व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली एक हजार रुपयांपेक्षा अधिक मूल्य असलेली कोणतीही भारतीय किंवा विदेशी वस्तू किंवा असे चलन असून त्यांच्या संबंधात या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करण्यात आले आहे किंवा करण्यात येत आहे, तर तो अशी वस्तू किंवा चलन सक्तीने ताब्यात घेऊ शकेल.

**'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' यानुसार अभिग्रहण करणे.**

१७. या अधिनियमान्वये करावयाचे प्रत्येक अभिग्रहण हे 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २)—कलम १०० याच्या उपबंधानुसार करण्यात येईल.

**या अधिनियमाचे व्यतिक्रमण करून मिळविलेल्या वस्तू किंवा चलन सरकारजमा करणे.**

१८. कलम १६ अन्वये सक्तीने ताब्यात घेण्यात आलेली कोणतीही वस्तू किंवा चलन हे या अधिनियमाचे व्यतिक्रमण करून स्वीकारण्यात किंवा मिळविण्यात आलेले आहे असा कलम १९ अन्वये अभिनिर्णय देण्यात आलेला असेल, तर अशी वस्तू किंवा चलन सरकार जमा होण्यास पात्र ठरेल.

**सरकारजमा करण्यासंबंधीचा अभिनिर्णय.**

१९. कलम १८ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सरकारजमा करण्यासंबंधी अभिनिर्णय—

(क) ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये अभिग्रहण करण्यात आले असेल त्या सत्र न्यायालयाला करता येईल—याबाबतीत कोणतीही मर्यादा नाही, आणि

(ख) सहायक सत्र न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा खालचा दर्जा नसलेला जो अधिकारी केंद्र शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याला, विहित करण्यात येतील अशा मर्यादांच्या अधीनतेने, करता येईल.

**सरकारजमा करण्याच्या अभिनिर्णयापूर्वी बाजू मांडण्याची संधी देणे.**

२०. ज्या व्यक्तीकडून कोणतीही वस्तू किंवा चलन सक्तीने ताब्यात घेतले आहे अशा व्यक्तीला, ती वस्तू किंवा चलन सरकारजमा करण्याविरुद्ध अभिवेदन करण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय सरकारजमा करण्यासंबंधी असा कोणताही अभिनिर्णयादेश दिला जाणार नाही.

---

१. १९८५ चा अधिनियम १, कलम ७ द्वारे वर्ग 'एकचे पद' या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला. (२० ऑक्टोबर, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे मूळ अधिनियमातील कलम १५ नंतर 'कलम १५ क' समाविष्ट केले. (२० ऑक्टोबर, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२१. (१) कलम १९ अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशामुळे नाराज झालेली कोणतीही व्यक्ती,— अपील.

(क) हा आदेश सत्र न्यायालयाने काढलेला असेल त्या बाबतीत, असे सत्र न्यायालय ज्याला दुय्यम आहे त्या उच्च न्यायालयाकडे; किंवा

(ख) हा आदेश कलम १९ च्या खंड (ख) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने काढलेला असेल त्याबाबतीत, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांच्या आत, असा सरकारजमा करण्यासंबंधीचा अभिनिर्णयादेश काढण्यात आला असेल त्या सत्र न्यायालयाकडे,

असा आदेश अशा व्यक्तीला कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत अपील करू शकेल :

परंतु, अपीलकर्त्याला उक्त एक महिन्याच्या कालावधीमध्ये अपील दाखल करता आले नाही याला पुरेसे कारण होते अशी जर अपील न्यायालयाची खात्री झाली तर, अपील न्यायालय असे अपील दाखल करण्यास आणखी एक महिन्याचा कालावधी देऊ शकेल, त्यापेक्षा अधिक मात्र नाही.

(२) कलम ५–पोटकलम (१) मधील स्पष्टीकरणाच्या अनुरोधाने काढलेल्या आदेशामुळे अथवा कलम ५ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ९ किंवा १० अन्वये केंद्र शासनाने काढलेला परवानगी द्यावयाचे नाकारणारा आदेश किंवा (अन्य) कोणताही आदेश यामुळे नाराज झालेली कलम ५ मध्ये निर्देशित केलेली कोणतीही संघटना किंवा कलम ९ किंवा कलम १० मध्ये निर्देशित केलेली अशी कोणतीही व्यक्ती किंवा कोणताही अधिसंघ अशा आदेशाविरुद्ध, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अपील करू शकेल व ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये अपीलकर्ता सर्वसाधारणपणे राहतो किंवा कामधंदा चालवतो किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः काम करतो, किंवा अपीलकर्ता हा एखादी संघटना किंवा अधिसंघ असल्यास अशा संघटनेचे किंवा अधिसंघाचे मुख्य कार्यालय आहे अशा उच्च न्यायालयाकडे ते दाखल करावे लागेल.

(३) या कलमाखाली दाखल केलेले प्रत्येक अपील हे मूळ हुकूमनाम्यावरून दाखल केलेले अपील आहे असे मानण्यात येईल आणि 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याच्या पहिल्या अनुसूचीच्या ४१ व्या आदेशाचे उपबंध ज्याप्रमाणे मूळ हुकूमनाम्यावरून केलेल्या अपिलाला लागू होतात त्याप्रमाणे व शक्य तेथवर याही अपिलाला लागू होतील.

२२. कलम १२ अन्वये जिच्यावर कोणताही मनाई आदेश बजावण्यात आला आहे अशा कोणत्याही व्यक्तीने अशा मनाई आदेशाचे व्यतिक्रमण करून कोणतीही भारतीय किंवा विदेशी वस्तू किंवा चलन यांचा कोणत्याही पद्धतीने भरणा केला, ते सुपूर्द केले किंवा हस्तांतरित केले किंवा त्याबाबत अन्य व्यवहार केला तर, त्याला तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही शिक्षा होतील आणि 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) यामध्ये काहीही असले तरी, अशा व्यतिक्रमणाच्या प्रकरणाची संपरीक्षा करणारे न्यायालय दोषी ठरलेल्या व्यक्तीवर जिच्या बाबतीतील मनाई आदेशाचे तिने उल्लंघन केले आहे त्या वस्तूच्या बाजारमूल्याइतका किंवा त्या चलनाच्या रकमेइतका किंवा न्यायालयाला योग्य वाटेल अशा त्याच्या भागाइतका जादा द्रव्यदंड बसवू शकेल. **कलम १२ चे व्यतिक्रमण करून वस्तू किंवा चलन मिळविल्याबद्दल शिक्षा.**

२३. (१) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करून जो कोणी विदेशी उगमस्थानाकडून कोणतेही विदेशी अभिदान किंवा कोणतेही चलन स्वीकारील अथवा ते स्वीकारण्याच्या कामी कोणत्याही व्यक्तीला किंवा राजकीय पक्षाला सहाय्य करील त्याला पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही शिक्षा होतील. **या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.**

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करून जो कोणी कोणत्याही विदेशी पाहुणचाराचा स्वीकार करील त्याला तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

२४. 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरी जर, एखाद्या व्यक्तीने कोणत्याही भारतीय अथवा विदेशी वस्तूच्या किंवा चलनाच्या संबंधात, जी कृती करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल अशी व्यक्ती दोषी ठरल्यास, अशा पूर्वोक्त कृतीमुळे किंवा अकृतीमुळे अशी वस्तू किंवा असे चलन सरकारजमा होण्यास पात्र ठरू शकेल अशी कोणतीही कृती किंवा अकृती केली तर अशा व्यक्तीची संपरीक्षा करणारे न्यायालय अशा व्यक्तीवर, जर अशी वस्तू किंवा असे चलन सरकारजमा होण्यासाठी उपलब्ध नसेल तर त्या वस्तूच्या किंवा चलनाच्या मूल्याच्या जास्तीत जास्त पाचपट किंवा एक हजार रुपये यांपैकी अधिक असेल तितका द्रव्यदंड बसवू शकेल, आणि अशा रीतीने बसवण्यात आलेला द्रव्यदंड, हा या अधिनियमान्वये अशा व्यक्तीवर बसवण्यात येईल अशा अन्य कोणत्याही द्रव्यदंडाव्यतिरिक्त असेल. **वस्तू किंवा चलन सरकारजमा करण्यासाठी उपलब्ध नसेल त्या बाबतीत जादा द्रव्यदंड बसविण्याची शक्ती.**

२५. या अधिनियमातील ज्या उपबंधाच्या संबंधात या अधिनियमात कोणत्याही निराळ्या शिक्षेची तरतूद करण्यात आलेली नाही अशा कोणत्याही उपबंधाचे अनुपालन करण्यात कसूर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास, किंवा जास्तीत जास्त एक हजार रुपये इतका द्रव्यदंड, किंवा दोन्ही शिक्षा होतील. **स्वतंत्र शिक्षेची तरतूद करण्यात न आलेल्या अपराधांकरिता शिक्षा.**

[1][विदेशी अभिदानाच्या स्वीकृतीस मनाई.

२५क. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम २३ याचे पोटकलम (१) किंवा कलम २५ या अन्वये कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरलेली कोणतीही व्यक्ती, जेथवर असा अपराध विदेशी अभिदानाच्या स्वीकृतीच्या किंवा विनियोगाच्या संबंधात असेल तेथवर, अशा अपराधाबद्दल पुन्हा-दोषी ठरल्यास ती नंतर दोषसिद्धीच्या तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतीसाठी कोणत्याही विदेशी अभिदानाचा स्वीकार करणार नाही.]

कंपन्यांनी केलेले अपराध.

२६. (१) जर या अधिनियमाखालील किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमाखाली अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तर, अपराध घडला त्यावेळी जी जी व्यक्ती कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल तिची प्रभारी होती किंवा तिला जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास त्या पात्र होतील:

परंतु, अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे वाजवी तत्परता दाखवली होती असे जर त्या व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर या अधिनियमाखालील किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमाखालील अपराध कंपनीने केलेला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने तो अपराध करण्यात आला होता अथवा त्याने केलेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र होईल.

**स्पष्टीकरण**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे आणि त्यामध्ये पेढी, सोसायटी, व्यवसाय संघ किंवा अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे; आणि

(ख) "संचालक" याचा पेढी, सोसायटी, व्यवसाय संघ किंवा अन्य व्यक्तिसंघ यांच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार अथवा अशी सोसायटी, व्यवसाय संघ किंवा अन्य व्यक्तिसंघ याच्या शासक मंडळाचा सदस्य, असा आहे.

या अधिनियमाखालील अपराधांचे खटले चालविण्याला आडकाठी.

२७. कोणतेही न्यायालय, केंद्र शासनाच्या किंवा त्या शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

या अधिनियमाखालील प्रकरणांचे अन्वेषण.

२८. 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबाबत केंद्र शासन यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्याला अन्वेषण करता येईल आणि अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याला दखलपात्र अपराधामध्ये अन्वेषण करताना, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला असतात त्या सर्व शक्ती असतील.

सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

२९. या अधिनियमाचे उपबंध, किंवा त्या अन्वये केलेला कोणताही नियम किंवा आदेश याखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे घडून आलेल्या किंवा घडण्याचा संभव असलेल्या कोणत्याही हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल केंद्र शासनाच्या विरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

३०. (१) केंद्र शासनाला या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याकरिता शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींकरिता उपबंध करता येईल, त्या बाबी अशा :—

(क) कलम ६ मध्ये निर्देशित केलेल्या अधिसंघाने आपणास मिळालेल्या विदेशी अभिदानासंबंधीची सूचना किती मुदतीत आणि कशा पद्धतीने द्यावयाची ;

(ख) मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या, पाठ्यवेतने किंवा तत्सम स्वरूपाच्या रकमा मिळाल्याचे केंद्र शासनाला कोणत्या मर्यादेपर्यंत कळविण्याची गरज नाही ;

---

१. १९८५ चा अधिनियम १, कलम ९ द्वारे मूळ अधिनियमातील कलम २५ नंतर "कलम २५क" समाविष्ट केले. (२० ऑक्टोबर १९८४ रोजी व तेव्हापासून).

(ग) विदेशी उगमस्थानाकडून कोणत्याही शिष्यवृत्त्या, पाठ्यवेतने किंवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही रकमा मिळणाऱ्या व्यक्तींनी किती मुदतीत आणि कशा पद्धतीने सूचना द्यावयाची;

(घ) निवडणुकीतील उमेदवाराने, तो असा उमेदवार झाल्याच्या दिनांकापासून एकशे आठ दिवसांच्या आत केव्हाही त्याला मिळालेल्या विदेशी अभिदानाच्या रकमेबाबतची सूचना किती मुदतीत कशा पद्धतीने द्यावयाची ;

(ङ) विदेशी अभिदान किंवा विदेशी पाहुणचार स्वीकारण्यासाठी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी मिळविण्याकरिता कोणत्या नमुन्यात व कशा पद्धतीने अर्ज करावा लागेल ;

(च) कलम १२ अन्वये काढलेला मनाई आदेश कशा रीतीने बजवायचा ;

(छ) कलम १३ मध्ये निर्देशिलेले हिशेब आणि नोंदी कोणत्या नमुन्यात व पद्धतीने ठेवाव्या लागतील ;

(ज) सहायक सत्र न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी किती मर्यादे-पर्यंत सरकारजमा करण्यासंबंधीचा अभिनिर्णय करू शकेल ;

(झ) विहित करणे आवश्यक आहे किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) केंद्र शासनाने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही अपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा अपरिवर्तीत रुपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शुन्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**सूट देण्याची शक्ती.**

३१. केंद्र शासनाच्या मते सर्वसाधारण जनतेच्या हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा समयोचित असेल तर, ते आदेश काढून त्याद्वारे आणि आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीवर कोणताही अधिसंघ (राजकीय पक्ष नव्हे), संघटना किंवा कोणतीही व्यक्ती (निवडणुकीतील उमेदवार नव्हे) यांना या अधिनियमाचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही उपबंध लागू होण्यापासून सूट देऊ शकेल आणि ज्या ज्या वेळी आवश्यक असेल त्या त्या वेळी असा आदेश रद्द किंवा विशोधित करू शकेल.

**सरकारी संव्यवहारांना हा अधिनियम लागू न होणे.**

३२. या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट भारत सरकार आणि कोणत्याही परकीय देशाचे किंवा प्रदेशाचे सरकार यांच्यामधील कोणत्याही संव्यवहारास लागू होणार नाही.

## THE FOREIGN CONTRIBUTION (REGULATION) ACT, 1976

## विदेशी अभिदान (विनियमन) अधिनियम, १९७६

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| adjudge | अभिनिर्णय करणे .. | [S. 19] |
| agency | उपयंत्रणा .. | [S. 2(1)(e)(i)] |
| associate | सहयोगी कंपनी .. | [S. 2(1)(j)] |
| association | अधिसंघ .. | [S. 2(1)(a)] |
| candidate for election | निवडणुकीतील उमेदवार .. | [S. 2(1)(b)] |
| cartoonist | व्यंगचित्रकार .. | [S. 4(1)(b)] |
| columnist | स्तंभलेखक .. | [S. 4(1)(b)] |
| correspondent | वृत्तप्रतिनिधी .. | [S. 4(1)(b)] |
| credit | पतमान्यता .. | [S. 12] |
| currency | चलन .. | [S. 24] |
| delivery | सुपूर्द करणे .. | [S. 2(1)(c)] |
| editor | संपादक .. | [S. 4(1)(b)] |
| elective body | निर्वाचनसिद्ध निकाय .. | [S. 2(f)(vii)] |
| employee | कर्मचारी .. | [S. 4(1)(c)] |
| foreign contribution | विदेशी अभिदान .. | [S. 2(1)(c)] |
| foreign country | परकीय देश .. | [S. 2(1)(e)(i)] |
| foreign exchange | विदेशी विनिमय चलन .. | [S. 8(f)] |
| foreign hospitality | विदेशी पाहुणचार .. | [S. 2(1)(d)] |
| foreign institution | विदेशी संस्था .. | [S. 2(1)(e)(x)] |
| foreign source | विदेशी उगमस्थान .. | [S. 2(1)(e)] |
| foreign territory | विदेशी प्रदेश .. | [S. 2(1)(e)(i)] |
| governing body | शासक मंडळ .. | [S. 26-expl.(b)] |
| individual | मनुष्यव्यक्ती .. | [S. 11(i)] |
| legislature | विधानमंडळ .. | [S. 2(1)(f)] |
| multi-national corporation | बहुराष्ट्रीय निगम | [S. 2(1)(e),(iii)(a)] |
| political party | राजकीय पक्ष .. | [S. 2(1)(g)] |
| printer | मुद्रक .. | [S. 4(1)(b)] |
| prohibitory order | मनाई आदेश .. | [S. 22] |
| publisher | प्रकाशक .. | [S. 4(1)(b)] |
| relative | नातेवाईक .. | [S. 8 expl.] |
| seizure | १. अभिग्रहण .. | [S. 15-m.n.] |
| | २. सक्तीने ताब्यात घेणे .. | [S. 15] |
| servant | सेवक .. | [S. 4(1)(c)] |
| society | सोसायटी .. | [S. 2(1)(e)(ix)] |
| subsidiary | पोट-कंपनी .. | [S. 2(1)(j)] |
| trade union | व्यवसाय संघ .. | [S. 2(1)(k)] |

# विदेशी अभिदान (विनियमन) अधिनियम, १९७६

# THE FOREIGN CONTRIBUTION (REGULATION) ACT, 1976

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिसंघ | association | [क. २(१)(क्)] |
| अभिग्रहण | seizure | [क. १५ स.टी.] |
| अभिनिर्णय करणे | adjudge | [क. १९] |
| उपयंत्रणा | agency | [क. २(१)(ङ्)(एक)] |
| कर्मचारी | employee | [क.४(१)(ग्)] |
| चलन | currency | [क. २४] |
| नातेवाईक | relative | [क. ८-स्पष्टी.[ |
| निवडनुकीतील उमेदवार | candidate for election | [क. २(१)(ख्)] |
| निवडणुकीने तयार होणारा निकाय | elective body | [क. २(च्)(सात)] |
| पतमान्यता | credit | [क. १२] |
| परकीय देश | foreign country | [क. २(१)(ङ्)(एक)] |
| पोट-कंपनी | subsidiary | [क. २(१)(ञ्)] |
| प्रकाशक | publisher | [क. १(१)(ख्)] |
| बहुराष्ट्रीय निगम | multi-national coporation | [क. २(ङ्)(तीन)(ख्)] |
| मनाई आदेश | prohibitory order | [क. २२] |
| मनुष्यव्यक्ती | invididual | [क. ११(१)] |
| मुद्रक | printer | [क. ४(१)(ख्)] |
| राजकीय पक्ष | political party | [क. २(१)(छ्)] |
| विदेशी अभिदान | foreign contribution | [क. २(१)(ङ्)] |
| विदेशी उगमस्थान | foreign source | [क. २(१)(ङ)] |
| विदेशी पाहुणचार | foreign hospitality | [क. २(१)(घ्)] |
| विदेशी विनियम चलन | foreign exchange | [क. ८(च्)] |
| विदेशी संस्था | foreign institution | [क. २(१)(ङ्)(दहा)] |
| विधानमंडळ | legislature | [क. २(१)(च्)] |
| वृत्तप्रतिनिधि | correspondent | [क. ४(१)(घ्)] |
| व्यंगचित्रकार | cartoonist | [क. ४(१)(ख्)] |
| व्यवसाय संघ | trade union | [क. २६-स्पष्टी.(ख्)] |
| शासक मंडळ | governing body | [क. २६-स्पष्टी.(ख्)] |
| सक्तीने ताब्यात घेणे | seizure | [क. १५] |
| संपादक | editor | [क. ४(१)(ख्)] |
| सहयोगी कंपनी | associate | [क. २(१)(अ्)] |
| सुपूर्द करणे | delivery | [क. २(१)(ग्)] |
| सेवक | servant | [क. ४(१)(ग्)] |
| सोसायटी | society | [क. २(१)(ङ्)(नऊ)] |
| स्तंभ लेखक | columnist | [क. ४(१)(ख्)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : ३६३ २६ ९३, ३६३ ०६ ९५
  ३६३ ११ ४८, ३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : ६६ ८८ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : ५२ २६ १५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१
  दूरध्वनी : ३३ १४ ६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : ६५ ०३ ९५ व ६५ ०४ ०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते